मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना सभापतींची मान्यता...!

## शहरातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, स्वच्छता यासह विविध महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी देण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिति सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली. या बैठकीत शहरातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि नागरिक सुविधांशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी देण्यात आली.



यावेळी स्थायी समिती सदस्यांसह महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सभेत आकुर्डी हॉस्पिटल, नेत्र रुग्णालय, भोसरी रुग्णालय तसेच इतर आरोग्य केंद्रांमध्ये फायर सेफ्टी ऑडिटनुसार दुरुस्ती आणि सुरक्षाविषयक कामांना मंजुरी देण्यात आली. तसेच जिजामाता रुग्णालय, मासुळकर हॉस्पिटल आणि इतर वैद्यकीय प्रकल्पांसाठी आवश्यक सुविधा उभारण्यासही हिरवा कंदील देण्यात आला.

महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य, स्मार्ट किड्स फिटनेस किट, एमएससीआयटी केंद्राचे नूतनीकरण आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविणाऱ्या उपक्रमांना मंजुरी देण्यात आली. शहर कचरामुक्त करण्यासाठी जनजागृती संस्था नियुक्ती, स्वच्छ भारत अभियानांतर्गत एजन्सी निवड तसेच विविध भागातील नालेसफाई आणि कचरा व्यवस्थापनालाही मान्यता मिळाली.

याशिवाय थेरगाव, रहाटणी, सांगवी, रावेत, पिंपळे निलख, चिखली आदी भागांत रस्ते, फुटपाथ, जलनिस्सारण, बोअरवेल, विद्युत कामे आणि इतर नागरी सुविधा उभारण्याच्या प्रस्तावांनाही मंजुरी देण्यात आली.

महापालिकेच्या या निर्णयांमुळे शहरातील विकासकामांना गती मिळणार असून नागरिक सुविधांमध्ये मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> **“शहराच्या शाश्वत विकासासाठी आणि नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आजच्या सभेत आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक प्रलंबित कामांना गती देण्यात आली आहे. विशेषतः शाळांचे सक्षमीकरण, रुग्णालयांची सुरक्षा आणि पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई या विषयांना आम्ही प्राधान्य दिले आहे. पारदर्शक कारभार आणि वेळेत काम पूर्ण करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.”**
>
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये 28 एप्रिलला पाणीपुरवठा राहणार बंद

## निगडी जलशुद्धीकरण केंद्राच्या दुरुस्तीमुळे शहरभर परिणाम; 29 एप्रिलला सकाळी अनियमित व कमी दाबाने पाणीपुरवठा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या वतीने निगडी जलशुद्धीकरण केंद्र येथे करण्यात येणाऱ्या स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामामुळे मंगळवार २८ एप्रिल रोजी पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवारी २९ एप्रिल रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल, अशी माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.



शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से. क्र. २३ येथील तसेच क्षेत्रीय स्तरावरील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

महापालिकेच्या वतीने निगडी जलशुद्धीकरण केंद्र येथे करण्यात येणाऱ्या स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी २८ एप्रिल रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार असून, २९ एप्रिलला सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल.

> **निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरील देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी २८ एप्रिल रोजी सायंकाळी पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरेसा साठा करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध वापर करून सहकार्य करावे. देखभाल-दुरुस्तीची सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील राहील.**
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# महापालिकेकडून घरपोच मालमत्ता कर बिल वाटपाला सुरुवात...

## महिला बचत गटांमार्फत घराघरात कर बिलांचे वाटप; डिजिटल ‘सिद्धी’ ॲपमुळे प्रक्रिया अधिक वेगवान

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या वतीने आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर बिलांचे घरपोच वाटप महिला बचत गटांच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे. शहरातील प्रत्येक मालमत्ताधारकापर्यंत कर बिल वेळेत पोहोचविण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत असून, बिल वाटपासाठी येणाऱ्या महिलांना नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापौर रवी लांडगे यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र तसेच मोकळ्या जागांसह सुमारे ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मिळकती आहेत. मालमत्ता सर्वेक्षणातून नव्याने सापडलेल्या मिळकतींची नोंदणी सुरू असून, एकूण मिळकतींची संख्या ८ लाखांपर्यंत होण्याची शक्यता आहे. या सर्व मिळकतींच्या कर देयकांचे वितरण महिला बचत गटांमार्फत घरोघरी करण्याची कामकाज महापालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळ यांना दिलेले आहेआहे. गेल्या तीन वर्षांत महिलांनी ही जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली आहे.



> मालमत्ता कर बिलांचे शंभर टक्के वितरण पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.‘सिद्धी’ ॲपच्या माध्यमातून वितरण प्रक्रिया अधिक वेगवान आणि पारदर्शक करण्यात आली आहे. नागरिकांनी आपले मोबाईल क्रमांक अद्ययावत करून वेळेत कर भरावा, तसेच थकबाकी असल्यास तत्काळ भरणा करून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> - सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकेंद्री सेवेला प्राधान्य देत आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून मालमत्ता कर बिलांचे घरपोच वितरण केल्यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक मजबूत होतो. ही मोहीम केवळ कर संकलनापुरती मर्यादित नसून महिला सक्षमीकरणालाही चालना देणारी आहे. नागरिकांनी या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत वेळेत कर भरावा.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून मालमत्ता कर बिलांचे घरपोच वितरण हा त्याच दिशेने उचललेला महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना वेळेत माहिती मिळून कर भरण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे, तसेच महिलांना रोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाची संधी मिळत आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला कर वेळेत भरावा.
>
> - तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

कर आकारणी व कर संकलन विभागाने यावर्षी पर्यंत सर्व देयकांचे वितरण पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. थकबाकीदारांना थकीत रक्कम भरण्याबाबत जप्तीपूर्वीची नोटीस देयकासोबत दिली जाणार असून, त्यामुळे नागरिकांना वेळेत कर भरण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यासोबतच महिला बचत गटांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन मोबाईल क्रमांक अद्ययावत करणे, करासंदर्भातील माहिती देणे आणि प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करणे अशी कामेही केली जाणार आहेत.

या उपक्रमातून महिला सक्षमीकरणालाही चालना मिळत आहे. समाज विकास विभाग आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘सक्षम’ प्रकल्पांतर्गत महिला बचत गट फेडरेशनच्या ६०० हून अधिक महिलांमार्फत ही मोहीम राबवली जात आहे. तसेच, ‘सिद्धी’ ॲपच्या माध्यमातून मालमत्ताधारकांना घरपोच बिल वितरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या डिजिटल प्रणालीमुळे वितरण प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि सुलभ झाली आहे.

# प्रदूषण करणारे 14 आरएमसी प्लान्ट सील; महापालिकेकडून 22 प्लान्टची तपासणी

## ही कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात वायू व ध्वनी प्रदूषणात वाढ होत आहे. प्रदूषण करणाऱ्या रेडिमिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्लान्टची तपासणी करून, महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून 14 प्लान्टवर कारवाई करण्यात आली. ते प्लान्ट सील करण्यात आले आहेत. ही कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याचे पालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले

आरएमसी प्लान्टची डोकेदुखी वाढत्या प्रदूषणामुळे नागरिक बेजार, असे ठळक वृत्त दैनिक पुढारीने 19 एप्रिल रोजी प्रसिद्ध केले होते. प्रदूषण करणाऱ्या प्लान्टवर ठोस कारवाई करण्याची मागणी शहरवासीयांकडून करण्यात येत आहे. त्याची दखल घेऊन पर्यावरण विभागाने शहरातील आरएमसी प्लान्टची तपासणी मोहीम हाती घेतली आहे



### शहरातील वायू प्रदूषण कमी करणार

» शहरातील वायू प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळविणे ही महापालिकेची सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. बांधकाम व औद्योगिक प्रकल्पांनी पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा नियमभंग सहन केला जाणार नाही. प्रदूषण करणार्‍या घटकांवर सातत्याने कारवाई करून शहरातील वायू गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे, असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

महापालिकेच्या उपद्रव शोध पथकांमार्फत शहरातील आरएमसी प्लान्टची तपासणी मोहीम राबविण्यात आली. एकूण 22 आरएमसी प्रकल्पांची पाहणी करण्यात आली. तपासणीदरम्यान पर्यावरणीय नियम व मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या 14 प्लान्टवर तात्काळ कारवाई करत त्यांना सील करण्यात आले. यामध्ये धूळ नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा नसणे, परिसरात पाण्याची फवारणी न करणे, उघड्यावर साहित्य साठवणे, धूळ नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभाव आदी गंभीर त्रुटी आढळून आल्या.

उर्वरित प्लान्टमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींनुसार संबंधितांना कडक इशारा देण्यात आला आहे. हवा गुणवत्ता निरीक्षण प्रणाली तातडीने बसविणे, पाण्याची नियमित फवारणी करणे, संपूर्ण प्लान्टभोवती शेड उभारणे, धूळ नियंत्रणासाठी योग्य उपाययोजना करणे याबाबी त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# महापालिकेचा ‘मास्टरस्ट्रोक’! एका क्लिकवर मिळणार सर्व मालमत्तांची कुंडली

## सिंगल विंडो प्लॅटफॉर्म आणि पेमेंट गेटवेचीही सुविधा; पुणे महापालिकेच्या मालमत्ता व्यवस्थापनात होणार ऐतिहासिक बदल.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या मालमत्तेची माहिती एकाच क्लिकवर मिळण्यासाठी डॅशबोर्ड विकसित करण्याचे नियोजन महापालिकेच्या मालमत्ता व्यवस्थापन विभागाने केले आहे. महापालिकेतील अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी बुधवारी यासंदर्भात आढावा घेतला. महापालिकेच्या मालमत्ता जतन संरक्षण देखभाल विनियोग, संचलन करण्यासाठी सर्व मालमत्तेचे सर्वेक्षण करून एकत्रित डेटाबेस तयार करणे आवश्यक आहे, जेणेकरून सदर मालमत्तांचा प्रभावीपणे विनियोग करणे शक्य होणार आहे.

असा यामागील हेतू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या आढावा बैठकीला उद्यानविभाग प्रमुख आणि सह महापालिका आयुक्त डॉ. अशोक घोरपडे, माहिती आणि जनसंपर्क विभागाचे उपायुक्त तुषार बाबर, क्रीडा विभागाच्या उपायुक्त आशा राऊत, परिमंडळ पाच चे उपायुक्त निखील मोरे, १५ क्षेत्रीय कार्यालयांचे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

महापालिका अंकीत असलेली सर्व क्षेत्रीय कार्यालये, तसेच पुणे महापालिकेमधील विविध विभागांच्या ताब्यात असलेल्या मालमत्तांची २१ मुद्द्यांच्या आधारे माहिती सर्वांनी अद्ययावत करण्यात येणार आहे. यामध्ये मिळकतीचा वापर, क्षेत्रफळ सर्वे नंबर, भाडेपट्ट्याबाबतची स्थिती, करारनामा बाबतची स्थिती, अतिक्रमणविषयक स्थिती, तसेच अक्षांश आणि रेखांश इत्यादी माहिती संकलित करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे सदर मालमत्तांची एकत्रित माहिती प्रणाली विकसित करण्याच्या अनुषंगाने आणि भाडेपट्टा आणि महसूल व्यवस्थापन यामधील त्रुटी दूर करण्यासाठी इएमएएमएस प्रणाली लागू करण्याच्या अनुषंगाने, तसेच मालमत्ता व्यवस्थापन प्रणाली मध्ये मूलभूत सुधारणा करण्यासाठी संगणक आज्ञावली (कम्प्युटर प्रोग्रॅम) विकसित करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे.

या प्रणालीमध्ये सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण जीआयएस मॅपिंग, डिजिटायझेशन, मूल्यांकन, सिंगल विंडो प्लॅटफॉर्म, पेमेंट गेटवे, सिस्टीम मॉनिटरिंग आणि रिपोर्टिंग करिता डॅशबोर्ड देखील विकसित करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. ही प्रणाली विकसित झाल्यानंतर सर्व मालमत्तांची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याचा दावा महापालिका प्रशासनातर्फे करण्यात आला आहे.




### GIS मॅपिंग ते ऑनलाइन पेमेंट

**» नवीन प्रणालीमध्ये सर्व मालमत्तांचे जीआयएस मॅपिंग, डिजिटायझेशन, मूल्यांकन, सिंगल विंडो प्लॅटफॉर्म आणि पेमेंट गेटवेची सुविधा उपलब्ध होणार आहे. तसेच सिस्टीम मॉनिटरिंग आणि रिपोर्टिंगसाठी आधुनिक डॅशबोर्ड तयार केला जाणार आहे. यामुळे भाडेपट्टा, महसूल व्यवस्थापन आणि तक्रार निवारण प्रक्रिया अधिक पारदर्शक व जलद होणार आहे. महापालिकेच्या मालमत्तांमधून उत्पन्न वाढविण्यासाठी ही प्रणाली महत्त्वाची पायरी मानली जात आहे.**

### एका क्लिकवर मालमत्ता माहिती

**» पुणे महापालिकेच्या मालमत्तांची संपूर्ण माहिती नागरिक आणि प्रशासनाला एकाच क्लिकवर उपलब्ध व्हावी यासाठी स्मार्ट डॅशबोर्ड विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महापालिकेच्या मालमत्ता व्यवस्थापन विभागाने यासाठी हालचाली सुरू केल्या असून अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी आढावा बैठक घेतली. या डॅशबोर्डमुळे शहरातील सर्व महापालिका मालमत्तांचा तपशील एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. मालमत्तांचा प्रभावी वापर, देखभाल आणि महसूल वाढीसाठी ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे.**

### २१ मुद्द्यांवर माहिती संकलन

**» महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालये आणि विविध विभागांच्या ताब्यातील मालमत्तांची माहिती २१ मुद्द्यांच्या आधारे अद्ययावत केली जाणार आहे. यामध्ये मालमत्तेचा वापर, क्षेत्रफळ, सर्व्हे नंबर, भाडेपट्टा स्थिती, करारनामा, अतिक्रमण, अक्षांश-रेखांश यांसारखी माहिती समाविष्ट आहे. या माहितीच्या आधारे एकत्रित डेटाबेस तयार होणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या मालमत्तांवरील नियंत्रण मजबूत होईल आणि अचूक नियोजन करणे शक्य होणार आहे.**

# आरटीओचा दणका! नियमांचे उल्लंघन करणाऱ्या 100 खासगी बसेसवर कारवाई

## पुणे आरटीओच्या 8 पथकांकडून संगमवाडी ते कात्रजपर्यंत तपासणीचा धडाका; नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

शाळांना सुट्ट्या सुरू झाल्यामुळे बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांची रेल्वे, एसटीसह खासगी ट्रव्हल्सला गर्दी वाढू लागली आहे. त्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता लक्षात घेता पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने महामार्गावर धावणाऱ्या खासगी ट्रॅव्हल बसची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. मागील चार दिवसांत या धडक मोहिमेत २९० वाहनांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १०० बसवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

दि. १७ ते २० एप्रिल दरम्यान पुणे आरटीओच्या आठ विशेष पथकांतील ४५ अधिकाऱ्यांनी स्वारगेट, कात्रज, नवले ब्रीज, खेडशिवापूर, हडपसर, शिवाजीनगर, संगमवाडी या परिसरात खासगी कंत्राटी बसेसची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये कागदपत्रांची मुदत संपलेली असणे, आपत्कालीन दरवाजा आणि हँच सुस्थितीत नसणे,

अनधिकृत बदल, जादा भाडे आकारणे आणि मालाची वाहतूक करणे अशा गंभीर बाबींचा समावेश आहे. याशिवाय मद्यप्राशन करून वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाइलचा वापर आणि रॉंग पार्किंग करणाऱ्या चालकांवरही कारवाई करण्यात आली. ही कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी सांगितले.

आरटीओ प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यासाठी सुरक्षित प्रवास हीच आपली जबाबदारी, हे अभियान राबवून प्रवाशांशी थेट संवाद साधून आपत्कालीन परिस्थितीत घ्यायची काळजी आणि वाहतूक नियमांची माहिती दिली. या उपक्रमाचे प्रवाशांकडून स्वागत होत असून, वाहनचालकांनाही रस्ता सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.



### तक्रार नोंदविण्याचे आवाहन

**» आरटीओ प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यासाठी सुरक्षित प्रवास हीच आपली जबाबदारी, हे अभियान राबवून प्रवाशांशी थेट संवाद साधून आपत्कालीन परिस्थितीत घ्यायची काळजी आणि वाहतूक नियमांची माहिती दिली. दरम्यान, प्रवासात जादा भाडेदर आकारणी, तसेच प्रवासातील अडचणींबाबत प्रवाशांच्या तक्रारी असल्यास आपले नाव, भ्रमणध्वनी क्रमांक, तिकिटाच्या फोटोसह ८२७५३२३०१०१ या व्हॉट्सअप क्रमांवर अथवा mhl2prosecution.rtopune@gmail.com या ई-मेलवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन आरटीओने केले आहे.**

# प्रस्तावित 'रिंग रोड'साठी जमिनींची दरनिश्चिती

## सोलू, वडगाव शिंदे, निरगुडे येथील जमीन संपादनाला हिरवा कंदील; रखडलेल्या प्रकल्पाला मिळणार वेग

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) प्रस्तावित रिंग रोडसाठीच्या १४ पैकी तीन गावांमधील जमिनींच्या दरनिश्चितीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. सोलू, वडगाव शिंदे आणि निरगुडे या गावांतील जमिनींची दरनिश्चिती करण्यात आली असून, थेट जमीनखरेदीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडून 'पीएमआरडीए'ला देण्यात आला आहे.

पुणे आणि शहर परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी 'पीएमआरडीए'ने अंतर्गत तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीए) बाह्य असे दोन रिंग रोड तयार करण्याचे नियोजन केले आहे. त्यापैकी रस्ते विकास महामंडळाच्या रिंग रोडचे सुमारे ३० टक्के काम पूर्ण झाले आहे. तर, 'पीएमआरडीए'चा रिंग रोड गेल्या काही वर्षांपासून रखडला आहे.



### ११ गावांतून ९२.२५ हेक्टर जमीन संपादित होणार

» 'पीएमआरडीए'च्या रिंग रोडसाठी आंबेगाव, पिसोळी, वडाचीवाडी, कदमवाक वस्ती, कोलवडी, जांभूळवाडी, मांजरी खुर्द, भिलारेवाडी, मांगडेवाडी, गुजर निंबाळकरवाडी, येवलेवाडी या ११ गावांमधून ९२. २५ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. त्यापैकी भिलारेवाडी, मांगडेवाडी, गुजर- निंबाळकरवाडी या तीन गावांच्या मोजणीनंतर जमिनींचे दर निश्चित झाले आहेत. आता त्या पाठोपाठ सोलू, वडगाव शिंदे आणि निरगुडे या तीन गावांमधील जमीन 'पीएमआरडीए'च्या रिंग रोडसाठी संपादित करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

'पीएमआरडीए'चा रिंग रोड हा ८३ किलोमीटर लांबीचा आणि ६५ मीटर रुंदीचा आहे. या रिंग रोडसाठी सुमारे ७०० ते ७५० एकर जागेची आवश्यकता आहे. रस्ते विकास महामंडळ करीत असलेला रिंग रोड हा सोलू गावापर्यंत येत आहे. त्या ठिकाणी 'पीएमआरडीए'चा रिंग रोड येऊन मिळणार आहे. त्यामुळे आळंदी ते नगर रस्त्यावरील वाघोलीपर्यंत सुमारे साडेसहा किलोमीटर लांबीच्या रिंग रोडची जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया यापूर्वीच प्राधिकरणाने हाती घेतली आहे.

### वाहतूक कोंडीवर मोठा दिलासा

» पुणे आणि उपनगरांतील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पीएमआरडीएचा ८३ किलोमीटर लांबीचा आणि ६५ मीटर रुंदीचा रिंग रोड महत्त्वाचा ठरणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ७०० ते ७५० एकर जमिनीची आवश्यकता आहे. रस्ते विकास महामंडळाचा बाह्य रिंग रोड सोलूपर्यंत पोहोचत असल्याने पुढे पीएमआरडीएचा रिंग रोड त्याला जोडला जाणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास शहरातील वाहतूक भार मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

### पहिल्या टप्प्यात तीन गावांचा समावेश

» पीएमआरडीएच्या प्रस्तावित रिंग रोडसाठी पहिल्या टप्प्यात सोलू, वडगाव शिंदे आणि निरगुडे या तीन गावांतील जमिनींची दरनिश्चिती पूर्ण झाली आहे. या गावांतील आवश्यक जमीन संपादनासाठी जिल्हा प्रशासनाने थेट खरेदीचा प्रस्ताव पीएमआरडीएकडे पाठविला आहे. सोलू येथील ३४.६५ हेक्टर, वडगाव शिंदेतील ५.७१ हेक्टर आणि निरगुडेमधील १.४४ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. त्यामुळे रखडलेल्या रिंग रोड प्रकल्पाला प्रत्यक्ष गती मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

पहिल्या टप्प्यातील या तीन गावांमधील जमिनींचे दर निश्चित झाले आहेत. सोलू येथील ३४.६५ हेक्टर, वडगाव येथील ५.७१ हेक्टर आणि निरगुडे येथील १.४४ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. ही जमीन थेट खरेदीने खरेदी केली जाणार आहे. जमीन खरेदीसाठी रोख रक्कम अथवा टीडीआर देण्यात येणार आहे.

# ओटीपी प्रणाली मुळे आता प्रत्येक थेंबाची नोंद; जिल्हाधिकारी डुडी यांचा निर्णय

## नियम पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका अशा दोन्हीही ठिकाणी लागू होणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पाणीटंचाईच्या नावाखाली नागरिकांच्या तोंडचे पाणी पळवणाऱ्या आणि स्वतःचे खिसे भरणाऱ्या टँकर लॉबीला जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी अखेर हिसका दाखवला. शहरात पाणीपुरवठ्याचा बोजवारा उडाला असताना, टँकरच्या अनियमित फेऱ्या, वेळेचा पत्ता नाही आणि तक्रारींचा ढीग साचला असताना जिल्हा प्रशासनाने आता 'ओटीपी' आधारित टँकर नियंत्रण प्रणालीचा बडगा उगारला आहे. हा नियम पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका अशा दोन्हीही ठिकाणी लागू होणार आहे. याचा सरळ अर्थ एकच: जिल्ह्यात आता कोणताही टँकर मनमानी करू शकणार नाही

गेली अनेक वर्षे महापालिकांसह, ग्रामिण भागातही सर्रास टँकरचा काळाबाजार सुरू होता. सरकारी




नोंदीत एक फेरी आणि प्रत्यक्षात दुसरीकडेच पाणी विकण्याचे प्रकार, जाणूनबुजून उशीर करणे, रस्त्यात अर्ध्या पाण्याची गळती असे गैरप्रकार नित्याचेच झाले होते. नागरिक हैराण आणि टँकरवाले मालामाल, असे चित्र होते. या सगळ्या 'अर्थपूर्ण' व्यवस्थेला खीळ घालण्यासाठीच पुणे महापालिकेने प्रायोगिक तत्वावर ही प्रणाली काही महिन्यांपुर्वी आणली होती. सध्या बाणेर, म्हाळुंगे, सुस या भागात प्रणाली द्वारे कामकाज सुरु आहे.

या प्रणालीमध्ये टँकरच्या प्रत्येक फेरीची डिजिटल नोंद होते तसेच सोसायटीकडेही या प्रणाली द्वारे टँकरफेऱ्या समजतात. यात विकसित प्रणाली म्हणून कोणता टँकर कुठे जातो यावर लाईव्ह नजर राहणार आहे तसेच चालकाने मद्यपान केले आहे नाही या बाबत चाचणी घेऊनच टँकर चालवायची परवानगी मिळणार आहे. प्रत्येक टँकरवाहनाची विशिष्ट काळात तपासणी होणार असून त्याचा

### काय आहे नवीन प्रणाली?

» याशिवाय प्रत्येक टँकरला जीपीएस यंत्रणा बंधनकारक केली आहे. मुख्य नियंत्रण कक्षातून एका क्लिकवर कोणता टँकर कुठे थांबला, किती वेळ थांबला, कुठे वळला याची इत्यंभूत माहिती मिळेल. OTP प्रणालीमुळे नागरिकांच्या मोबाईलवर टँकर निघाल्याचा मेसेज, पोहोचण्याची अंदाजे वेळ आणि पाणी दिल्याचा कन्फर्मेशन कोड येणार. त्यामुळे 'टँकर आलाच नाही' सांगून पैसे लाटण्याचे दिवस संपले, असा प्रशासनाचा दावा आहे.

अहवाल प्रणालीतील कामकाजातील सर्व अधिकाऱ्यांना दिसणार आहे. सध्या मोजक्याच रिफिलिंग पॉइंटवर सुरू असलेली ही यंत्रणा आता सर्वच ठिकाणी बंधनकारक करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी डूडी यांना महापालिकेच्या या उपाययोजनेची भनक लागताच त्यांनी संबंधितांना पाचारण करीत पुणे आणि पिंपरी चिंचवडसह दोन्ही महापालिका व नंतर ग्रामिण भागातही ही उपाययोजना तातडीने लागू करण्याचा निर्णय बुधवारी घेतला. 'तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही. 'ओटीपी प्रणाली' शक्य तितक्या लवकर पूर्ण क्षमतेने राबवा, अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांनाही सुनावले.